वाचले :-

१. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : बीसीसी-२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दिनांक : ०७ मे, २०२१

२. पदोन्नती समिती सभा दि.०४/१०/२०२४ चा सभावृत्तांत.

३. मा. आयुक्त सो यांचा दिनांक : ०८ /१०/२०२४ रोजीचा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८
सामान्य प्रशासन विभाग
क्र.साप्रवि/२/कावि/६७५/२०२४
दिनांक : ०८ /१०/२०२४

**विषय : 'सहाय्यक आरोग्य अधिकारी' पदावरील पदोन्नतीबाबत.**

**आदेश,**

पिंपरी चिंचवड महापालिका आस्थापनेवर **'सहाय्यक आरोग्य अधिकारी'** या अभिनामाचे पद **पे.लेवल S-१६ वेतनश्रेणी ४४९००-१४२४००** या वेतनश्रेणीमध्ये शासन मंजूर आहेत. सदरची रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याकामी दि.०४/१०/२०२४ रोजी पदोन्नती समिती सभा आयोजित करण्यात आली होती.

प्रस्तुतच्या पदोन्नती समितीने पदोन्नतीपूर्व **'मुख्य आरोग्य निरीक्षक'** या पदावरील खालील कर्मचा-यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी, आरक्षण, सेवाज्येष्ठता, गोपनीय अहवाल, शिस्तभंग आणि मत्ता व दायित्वाची माहिती, संगणक अर्हता धारण केलेचे प्रमाणपत्र इ. सेवाविषयक तपशील पडताळून मा.सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये होणा-या अंतिम निर्णयाचे अधिन राहून तसेच दि. ०७ मे २०२१ रोजीचे शासन निर्देशानुसार निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार **'सहाय्यक आरोग्य अधिकारी'** पदावर **पे. लेवल S-१६ वेतनश्रेणी ४४९००-१४२४००** या वेतनश्रेणीत पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२० नुसार पदोन्नती देण्यास शिफारस केली आहे.

| अ.क्र. | अधिका-यांचे नाव | प्रवर्ग | पदोन्नतीने पदस्थापना द्यावयाचा विभाग |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | माने शांताराम आबू | ज्येष्ठतेनुसार | आरोग्य |
| २ | आढाव महेश नानासाहेब | ज्येष्ठतेनुसार | आरोग्य |

सबब, मी आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, उपरोक्त नमूद अधिकारी यांना पदोन्नतीमधील आरक्षण रद्द करण्यासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ असलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये होणारा अंतिम निर्णय व दि.७/०५/२०२१ चे शासन निर्णयास अधिन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार **'सहाय्यक आरोग्य अधिकारी'** या पदावर **पे.लेवल S-१६ वेतनश्रेणी ४४९००-१४२४००** या वेतनश्रेणीमध्ये पदोन्नती देण्यास प्रस्तुतच्या आदेशान्वये मान्यता देत आहे. तसेच त्यांच्या नावासमोर स्तंभ क्र.४ मध्ये नमूद केलेल्या विभागामध्ये पदोन्नतीने पदस्थापना देण्यात येत आहे. सदर पदोन्नती दिलेल्या अधिका-यांना आरोग्य विभागात पदस्थापना देणेत येत असून, या अधिका-यांचे सविस्तर कामकाज वाटपाचे आदेश विभागप्रमुखांनी निर्गत करुन तसे सामान्य प्रशासन विभागास अवगत करावे.

प्रस्तुत आदेशाची नोंद संबंधितांचे सेवानोंद पुस्तकामध्ये घेण्यात यावी.

**सही/-**
**(शेखर सिंह)**
आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,

प्रति,
सर्व संबंधित अधिकारी/कर्मचारी
प्रत-
१) लेखा विभाग  २) लेखापरिक्षण
३) सर्व संबंधित विभाग  ४) प्रशासन टेबल क्रमांक ९,१०,१२,१४,संगणक कक्ष

सहा. आयुक्त, (साप्रवि)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,